स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्र शाखेअंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधन आराखडा

(RESEARCH OUTLINE)

विषय

**‘दक्षिण कोकणातील पूर्वास्पृश्यांमधील बौध्द धम्मदीक्षेनंतरचे परिवर्तन
एक ऐतिहासिक अभ्यास (इ.स.१९५६ ते २००६)’**

संशोधक

प्रमोद एस. मेश्राम

(एम. ए. नेट.)

मार्गदर्शक

डॉ. राठोड यु. सी.

विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

नूतन महाविद्यालय, सेलू, ता. सेलू, जि. परभणी, ४३१५०३

१) **विषय**(Subject) -

‘दक्षिण कोकणातील पूर्वास्पृश्यांमधील बौध्द धम्मदीक्षेनंतरचे परिवर्तन एक ऐतिहासिक अभ्यास (इ.स.१९५६ ते २००६)’

२) **प्रस्तावना -** (Introducation)

भारतीय समाज हा जातीवाचक आहे. एक जात व साडेबारा पोटजाती अशा हजारो जातींच्या जंजाळात हिंदू समाजाला हजारो वर्षापासून जाणीवपुर्वक अडकवून ठेवण्यात आलेले आहे. या जाती ऐवढ्या घट्ट आहेत की भगवान गौतम बुध्दानंतर परिवर्तनाची मोठी चळवळ सुध्दा येथे यशस्वी ठरू शकली नाही. अर्वाचीन काळात पहिला धक्का महात्मा फुलें यांनी दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर सामाजिक चळवळीत क्रांतीच घडविली. शतकानुशतके अंधारात राहणाऱ्या कोट्यावधी बांधवांना त्यांनी प्रकाशाच्या वाटेवर आणून सोडले व चालण्याचेही बळ दिले. हजारो वर्षांपासून जो समाज ज्ञान, सत्ता व संपत्तीच्या अभावे गुलामी सोसत आलेला आहे अशा समाजास माणूस म्हणून उभे करण्याचा संकल्प डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. त्यासाठी त्यांनी ‘शिका, संघर्ष करा आणि संघटीत व्हा’ हा मूलमंत्र देऊन त्यांच्यात चेतना निर्माण केली.

हिंदू धर्मातील असलेली सामाजिक व धार्मिक विषमता नष्ट करण्यासाठी व समाजात समता प्रस्थापित व्हावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक आंदोलनामध्ये महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह, धार्मिक स्वातंत्र्यासाठी नाशिक काळाराम मंदिर सत्याग्रह व त्यांच्या प्रेरणेमुळेच झालेले महाराष्ट्रातील मुखेड गावचा अस्पृश्यांचा सत्याग्रह, अमरावतीचा अंबादेवीच्या देवळातील सत्याग्रह, पुणे येथील पर्वती मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह महत्त्वाचे आहेत. या सामाजिक व धार्मिक आंदोलनाच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्यांना त्यांचे न्याय व हक्क मिळवून द्यावयाचे होते व त्याचबरोबर सवर्ण हिंदूंचे हृदय परिवर्तनही करावयाचे होते. पण त्यात त्यांना पूर्णपणे यश आले नाही आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली येवले मुक्कामी धर्मांतराची घोषणा केली त १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर मुक्कामी आपल्या पाच लाख अनुयांयासमवेत ती पूर्ण केली.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लाखो अनुयांयासह बौध्द धर्माची दिक्षा घेतली. ही घटना जगाच्या इतिहासातील एकमेव अशी ‘सामाजिक क्रांती’ होती. जगाच्या इतिहासाच्या दृष्टीने एवढी मोठी घटना असूनही या घटनेची म्हणावी तशी दखल

भारतीयांकडून घेतल्या गेल्याचे दिसत नाही. मात्र या घटनेपासून दलितांनी विशेषत: पुर्वाश्रमीच्या हिंदू धर्मातील अस्पृश्य म्हणून हेटाळल्या गेलेल्या महार समाजाने आपल्या संपूर्ण संस्कृती व जीवनमूल्यांचा कायाकल्प करून घेत प्रगतीची वाट धरली. या वाटेवरून चालतांना धर्मदिक्षेनंतरच्या या नवबौध्द बनलेल्या समाजाने स्वउत्थान करून घेण्याची जी उर्मी, तडफ दाखविली ती जातीव्यवस्थेने खालच्या स्तरावर टाकून चिरडलेल्या इतर जाती समुहांनी कधी दाखविल्याचे दुसरे उदाहरण भारतीय इतिहासात नाही आणि यामुळेच एकमेव अशा ऐतिहासीक घटनेतून झालेला धर्मदिक्षित नवबौध्दांच्या इतिहासाचा आढावा समकालीन संदर्भात घेणे महत्त्वाचे व अत्यावश्यक ठरेल असे मला ठामपणे वाटते.

''मी सारा भारत बौध्दमय करेन'' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी यशवंतराव ऊर्फ भैय्यासाहेब आंबेडकर व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत धर्मांतराची चळवळ चालविलेली होती. त्याचाच एक भाग म्हणून दक्षिण कोकणातील (रत्नागिरी, सिंधुदुर्ग) या जिल्ह्यांमध्ये धर्मांतराच्या चळवळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूनंतर अनेक ठिकाणी घडवून आणल्या. ज्यामध्ये अनेक लोकांनी यशवंतराव आंबेडकर व त्यांच्या इतर कार्यकर्त्यांसमवेत बौध्द धर्माची दिक्षा घेतली. बौध्द धर्माची दिक्षा देतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेस उतरत बौध्द धर्म स्विकारलेल्या राज्य व देशभरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वैचारीक व राजकीय प्रगतीकडे आपली वाटचाल सुरू केली. या वाटचालीचे दक्षिण कोकणातील धर्मदिक्षित बौध्दांवरही प्रभाव पडणे स्वाभाविक होते. हे परिवर्तन समाज जीवनाच्या एका क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते तर सर्वच क्षेत्रात परिवर्तन घडून आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ आक्टोबर १९५६ ला धर्मचक्र गतीमान केले. धर्मदिक्षीत बौध्दांमध्ये झालेले परिवर्तन हा धर्मचक्र परिवर्तनाचा परिणाम होय, असे मला ठामपणे वाटते.

१५ ऑक्टोबर १९५६ रोजी दिक्षाविधीनंतर बौध्दांना उद्देशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते,''मात्र तुमचीही जबाबदारी मोठी आहे. तुमच्याब- ल इतर लोकांना आदर वाटेल, मान सम्मान वाटेल अशी तुम्ही कृती केली पाहिजे. हा धर्म म्हणजे आपण एक गळ्यात मडके अडकवून घेत आहोत असे मानू नका. बौध्द धर्माच्या दृष्टीने भारताची भूमी सध्या शुन्यवत आहे. म्हणून आपण उत्तम रितीने धर्म पाळण्याचा निर्धार केला पाहिजे. हे आपल्याला साधले तर आपण आपल्या बरोबर देशाचा, इतकेच नव्हे तर जगाचाही उध्दार करू. कारण बौध्द धर्मानेच जगाचा उध्दार होणार आहे.''

३)पूर्व अभ्यास(Previous Research)

डॉ. बाबासाहेब आंबडेकरांची धर्मदिक्षेची चळवळ संपूर्ण देशातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये महत्त्वपूर्ण आहे. ज्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समवेत पाच लाख अस्पृश्यांनी बौध्द धर्माची दिक्षा नागपूर मुक्कामी घेतली. ज्याचे पडसाद संपूर्ण भारतभर उमटणे स्वाभाविक होते. त्यामुळेच अस्पृश्यांच्या सर्वांगीण जीवनामध्ये आमुलाग्र परिवर्तन घडून आल्याचे दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मदिक्षेचे पडसाद महाराष्ट्रातही उमटणे स्वाभाविक होते आणि त्यामुळेच आज विदर्भात धर्मचक्र परिवर्तनानंतरचे परिवर्तन यावर शोधनिबंध प्रकाशित होत आहेत. मात्र कोकणात व विशेषकरून दक्षिण कोकणात अशा प्रकारचे प्रयत्न झालेले आढळत नाहीत आणि म्हणूनच उपरोक्त अभ्यासाकरीता प्रस्तावित विषय महत्त्वाचा आहे.

४) अभ्यास विषयाचे महत्व - (Significance of the Study)

प्राचीन काळापासून ते उत्तर आधुनिक काळापर्यंतचा भारताचा इतिहास पाहिला तर भारतीय समाजजीवनावर जातीव्यवस्थेचाच पगडा राहीलेला आपणाला दिसून येतो. त्यामुळे साहजिकच स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय जातिव्यवस्था व तिचे विविध पैलू हा सामाजिक शास्त्राच्या अभ्यासाचा महत्त्वाचा विषय बनला. विशेषत: समाजशास्त्रामध्ये या अनुषंगाने विस्तृत अभ्यास झाला व तो अजूनही चालू आहे. त्या तुलनेत इतिहासातील हा विषय कमी प्रमाणात अभ्यासला गेला. मराठे, पेशवे, स्वातंत्र्यलढा व त्यांचे विविध पैलू या विषयांभोवतीच महाराष्ट्रातील इतिहास संशोधन फिरत राहिल्यामुळे ‘सबाल्टर्न’ सारख्या नवनव्या दृष्टीकोनातून त्यातही समकालीन सामाजिक इतिहासावर फारसे काम झाले नाही असे मला वाटते. म्हणूनच मी निवडलेला प्रस्तावित विषय हा समकालीन व सामाजिक इतिहासाशी संबंधित असणे हेच त्याचे वेगळेपण आहे.

१) दक्षिण कोकणातील धर्मदिक्षित बौध्द समाज हा विषय घेऊन त्यांच्या प्रगतीचे अंकेक्षण करण्याचा हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे हा विषय वेगळा व म्हणूनच महत्त्वाचा ठरेल.

२) हिंदु धर्मातील पुर्वाश्रमीच्या अस्पृश्यांनी नवा बौध्द धर्म स्विकारून मोठी प्रगती साधली. त्यांच्या प्रगतीचे नेमके मापन या संशोधनातून केले जाणार असल्यामुळे हे संशोधन महत्त्वाचे ठरेल.

३) आधुनिक काळात बौध्द धर्माकडे आर्कषित होत असलेल्या हिंदु धर्मातील महारेत्तर शुद्रातिशुद्रांना या संशोधनातून निश्चितच दिशा निश्चितीस मदत मिळेल.

४) दलितांची - धर्मदिक्षित बौध्दांची प्रगती भरपूर झाली त्यामुळे आरक्षण कशाला हवे या सारख्या प्रश्नांची उत्तरे या संशोधनातून मिळू शकतील त्यामुळे हे संशोधन महत्त्वाचे ठरेल.

५) धर्मदिक्षित बौध्दांची बलस्थाने व उणिवा या अभ्यासातून पुढे येणार असल्यामुळे आत्मपरिक्षणाच्या दृष्टिने नव्य दिशा निश्चितीसाठी हे संशोधन महत्त्वाचे ठरेल.

५) संशोधनाचे प्रमुख उद्देश (Objective of the Study)

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात पुर्वाअस्पृश्यांनी केलेल्या धर्मांतरामागील कारणांचा ऐतिहासीक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्मच का स्वीकारला हे तपासणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित बौध्द धर्माचे वेगळेपण तपासणे.

४) दक्षिण कोकणातील धर्मदिक्षित बौध्दांमध्ये झालेले परिवर्तन हे धर्मक्रांतीचा परिणाम आहे का? याचा शोध घेणे.

५) दक्षिण कोकणातील धर्मदिक्षित अस्पृशांनी बौध्द धर्माच्या स्विकारानंतर सर्वच प्रकारच्या धार्मिक परंपरांचा त्याग केला का? याचा शोध घेणे.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौध्द धर्माच्या अनुषंगाने धर्मांतरीत बौध्दांमधील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

७) दक्षिण कोकणातील धर्मदिक्षीत बौध्दांमधील धार्मिक व सांस्कृतिक, आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

८) धर्मदिक्षित बौध्दांमधील वैचारिक व शैक्षणिक बदलांचा अभ्यास करणे.

९) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामुहिक धर्मांतराचे यशापयश अधोरेखीत करणे.

६) गृहितके - (Hypothesis)

१) चार्तुवर्ण्यव्यवस्थेवर व विषमतेवर आधारीत हिंदू समाज व्यवस्थेच्या गुलामीत बंदिस्त अस्पृश्यांना मुक्त करण्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांचे धर्मांतर घडवून आणले.

२) बौध्द धर्मात असलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुता अशा आधुनिक व लोकशाही व्यवस्थेस पोषक मुल्यांमुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्म निवडला.

३) आधुनिक भारतीय इतिहासातील सर्वात मोठी रक्तपातविरहीत समाजक्रांती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मदिक्षेमुळे घडून आली.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक मुल्यानुरूप नव्या बौध्द धर्माची मांडणी केली.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या नव्या धर्मामुळे पुर्वाअस्पृश्यांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व वैचारीक जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडून आले.

७) संशोधनपध्दती - (Research Methodology)

प्रास्तावित संशोधन कार्यासाठी ज्यांचा अभ्यास करावयाचा आहे त्या धर्मदिक्षित बौध्दांची दक्षिण कोकणातील लोकसंख्या चार लाखापेक्षा अधिक असल्यामुळे प्रश्नावली व मुलाखती घेण्यासाठी समग्र धर्मांतरीत बौध्दांमधून तिनशे व्यक्तींचीच निवड करून नमुना पध्दतीने अभ्यास केला जाईल. नमुना निवडीसाठी गैर संभाव्यता नमुना पध्दतीचा (Non Probability Sampling) उपयोग केला जाईल. गैर संभाव्यता पध्दत जरी वापरली जाणार असली तरी संशोधनात वस्तुनिष्ठता येण्यासाठी 'कोटा पध्दत' वापरून दक्षिण कोकणातील शहरी, ग्रामीण, उच्चपदस्थ, नोकरपेशा, व्यावसायिक, शेतकरी अशा सर्व स्तरावरील बौध्दांना नमुना निवडीत स्थान दिले जाईल.

प्रास्तावित अध्ययनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही तथ्य संकलनाच्या पध्दतीचा उपयोग केला जाईल.

- **प्राथमिक पध्दत :**

प्रस्तुत अध्ययनासाठी महत्त्वपूर्ण बाबींबाबत तथ्य संकलनासाठी प्राथमिक पध्दत वापरली जाईल. या पध्दतीनुसार तथ्य संकलनासाठी अवलोकन पध्दत, मुलाखत पध्दत व प्रश्नावली पध्दत वापरली जाईल व त्यासाठी 'अनुसूची तंत्र' उपयोगात आणले जाईल.

- **दुय्यम पध्दत :**

कुठल्याही ऐतिहासीक संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्या साधनांचा वापर करून तथ्ये संकलित करणे आवश्यक असते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी ग्रंथालय पध्दतीचा वापर केला जाईल. आवश्यक वाटल्यास महत्त्वपूर्ण दस्तऐवज व मुळ कागदपत्रांचे अंतरंग व बाह्य परीक्षण केले जाईल.

गोळा केलेल्या तथ्थांना विश्लेषित करण्यासाठी हस्तसारणीकरणाचा वापर करून तथ्थ प्रक्रीयन (Data Processing) केले जाईल.

८) संशोधनाची अभ्यास मर्यादा :(Limitation of the Study)

प्रास्तावित संशोधन कार्यासाठी अध्ययनाचे क्षेत्र दक्षिण कोकण राहील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर मुक्कामी धर्मदिक्षा पुर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना दिली व लगेचच ०६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर ''मी सारा भारत बौध्दमय करेन'' हे कार्य सत्यात उतरविण्यासाठी यशवंतराव आंबेडकर (भैय्यासाहेब) व त्यांच्या अनुयायांनी काश्मिर ते कन्याकुमारी पर्यंत धर्मदिक्षेचा कार्यक्रम घडवून आणला. त्यात त्यांनी १९५७ साली दक्षिण कोकणातील अस्पृश्यांना बौध्द धर्माची दिक्षा दिली आणि म्हणूनच धर्मांतराच्या (१९५६ ते २००६) या ५० वर्षात दक्षिण कोकणातील धर्मांतरीत बौध्दांची स्थिती नेमकी कशी आहे हे शोधणे त्या जिल्ह्यातील रहिवाशी म्हणून संशोधकाला आवश्यक वाटते.

संशोधन कार्यासाठी आवश्यक मुलाखती, प्रश्नावली भरूण घेणे व वेगवेगळी आकडेवारी मिळविणे इत्यादीबाबत दक्षिण कोकणातील दोन्ही जिल्हे हे प्रमुख संशोधन क्षेत्र व मर्यादा राहणार असले तरी तुलनात्मक अभ्यासासाठी आवश्यक माहिती व आकडेवारी महाराष्ट्रातून मिळविली जाईल.

प्रास्ताविक संशोधन विषयात धर्मांतरीत बौध्दांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व वैचारिक अशा सर्वच अंगांचा सखोल अभ्यास केला जाणार असल्यामुळे या संशोधनाची व्याप्ती केवळ इतिहास विषयापुरतीच मर्यादित न राहता ती समाजविज्ञान शाखेतील सर्वच विषयांना व्यापणारी राहील.

९) प्रकरण योजना - (Tentative Scheme of chapterisation)

प्रकरण १ले
भारतीय समाजव्यवस्था : अस्पृश्यांची स्थिती

भारतीय समाजामध्ये वर्णव्यवस्था व नंतर क्रमाक्रमाने जातीव्यवस्था निर्माण झाली. हिंदू धर्माची सामाजिक व्यवस्था ही वर्णव्यवस्थेवर व जातीवर आधारीत आहे. जीला जातीधर्माचा आधार आहे. त्यामुळेच तीला परमेश्वराची निर्मिती समजून समाजात जातीव्यवस्था सांभाळली जाते. हिंदू धर्माव्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्मात अस्पृश्यता आढळून येत नाही. त्यात दक्षिण कोकणातील हिंदू धर्मातील अस्पृश्यांचे स्थान, त्यांची समाजातील स्थिती कशी होती? याचा प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतचा संक्षिप्त अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येईल.

प्रकरण २रे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर व धर्मांतर

महाराष्ट्रात साधारणपणे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून समाजप्रबोधनाची चळवळ निर्माण झाली. ज्यामध्ये बाबा पद्मनजी, जोतिराव फुले, सर रामकृष्ण भांडारकर, न्या. रानडे, श्री. कृष्णराव अर्जुन केळूसकर, सिताराम केशव बोले, श्रीमंत सयाजीराव गायकवाड, छ. शाहू महाराज, इ.नी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केलेले दिसतात. या सर्वांचा भर स्पृश्यांच्या मतपरिवर्तनावर होता. परंतु यामध्ये महात्मा जोतिबा फुले यांचा अपवाद होता म्हणूनच त्यांनी उच्चवर्णीयांच्या विरूध्द बंडाचा मार्ग अवलंबिलेला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील महान विचारवंत होते. ज्यांनी सामाजिक व धार्मिक गुलामगिरीविरूध्द क्रांतिकारी आंदोलन केले. त्यांच्या क्रांतिकारी विचार व चळवळीमुळे शतकानुशतके गुलामीच्या निद्रेत असलेला अस्पृश्य समाज जागृत केला. त्यांनी १९२० ते १९५६ पर्यंत झालेल्या दलित चळवळीचे नेतृत्व स्वत: केले. दलितांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी मुकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता, प्रबुध्द भारत यासारखी वृत्तपत्रे चालवली. एवढेच नाही तर अस्पृश्यांना त्यांचे मानवीय अधिकार प्राप्त करून देण्यासाठी सामाजिक व धार्मिक सत्याग्रह केला. परंतु त्यांच्या सत्याग्रहांना पूर्णपणे यश आले नाही. त्यामुळेच त्यांनी नाशिक जिल्ह्यातील येवले येथे १३ ऑक्टोबर १९३५ रोजी धर्मांतराची घोषणा केली व त्यानंतर त्यांनी २१ वर्षापर्यंत भारतातील वेगवेगळ्या धर्मांचा

अभ्यास केला. या सर्वांगिण अभ्यासानंतर त्यांनी भारतातील समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय या तत्त्वांवर आधारित असलेला बौध्द धर्म निवडला व त्याची प्रत्यक्ष कृती नागपूर मुक्कामी केली.

६ डिसेंबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर 'मी सारा भारत बौध्दमय करेन' हे त्यांचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी यशवंतराव ऊर्फ भैय्यासाहेब आंबेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत १९५७ ते १९६३ पर्यंत अनेक अस्पृश्यांना बौध्द धर्माची दिक्षा दिली. असे धर्मांतराचे सोहळे दक्षिण कोकणातील खेड, चिपळूण, रत्नागिरी, पाली, लांजा, साखरपा, राजापूर, वैभववाडी, सिंधुदूर्ग, ओरोस, इ. ठिकाणी झाले. त्या दक्षिण कोकणातील धर्मांतराचा आढावा व धर्मांतराचे वेगवेगळ्या ठिकाणी झालेले सोहळे याचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येईल.

प्रकरण ३रे

दक्षिण कोकणातील धर्मांतरीत बौध्दांचे सामाजिक परिवर्तन

पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य म्हणून हेटाळल्या गेलेल्या अस्पृश्यांनी बौध्द धर्माचा स्विकार केला. ही जगातील एक महान क्रांती आहे जी हिंसेच्या जोरावर झाली नाही, तर वैचारिक परिवर्तनाच्या आधारावर झाली. त्यामुळे या क्रांतीला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. या धर्मक्रांतीमुळे भारतीय समाजातील मानवी हक्कांपासून वंचित असलेल्या दलित समाजाने आपली सर्वांगिण प्रगती साधली व सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न केला. धर्मांतराच्या पन्नास वर्षात इतर अनेक समाजावरही याचा प्रभाव पडताना दिसत आहे. धर्मांतरानंतरच्या पन्नास वर्षात बौध्दांनी समाजात आपले स्थान निर्माण केले. एकूणच काय तर बौध्द धर्माच्या स्विकारानंतर पन्नास वर्षात बौध्दांमध्ये झालेल्या सर्वांगिण सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येईल.

प्रकरण ४थे

दक्षिण कोकणातील धर्मांतरीत बौध्दांचे धार्मिक व सांस्कृतिक परिवर्तन

भारतीय समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक चळवळीच्या माध्यमातून केला होता. परंतु त्यामुळे विशेष परिवर्तन भारतीय समाजात होऊ शकले नाही. क्रांतीशिवाय भारतीय समाजात कोणत्याही प्रकारचे परिवर्तन होऊ शकत नाही याची स्पष्ट कल्पना डॉ. आंबेडकरांना आली होती. हिंदू धर्माचा त्याग करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व मानवतेवर आधारीत

बौध्द धर्माचा स्विकार करणे ही फार मोठी क्रांती होती. अस्पृश्य समाजाच्या दृष्टिने विचार केल्यास ती एक वैचारिक क्रांती होती. त्यामुळे धर्मांतरीत अस्पृश्य समाजात मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले. भारतातील बौध्दांची आधुनिक काळातील लोकसंख्या वाढली, देव-देवतांकडे बघण्याची त्यांची दृष्टी बदलली. आधुनिक काळातील बौध्दांमध्ये पूर्व नियोजित भाग्य किंवा प्राचीन कर्मकांड यावर बौध्दांवर मुळीच विश्वास राहिला नाही.

बौध्दांनी आपल्या सांस्कृतिक क्षेत्रातही परिवर्तन घडवून आणले. ज्यामध्ये स्तूप, चैत्य, महाविहार, बौध्द लेण्या, स्थापत्यकला, इ. प्राचीन भारतीय बौध्दांची सांस्कृतिक जीवनाची प्रतिके झाली. बौध्दांच्या कार्यक्रम मंचावर बौध्द धर्माची सांस्कृतिक प्रतिके असल्याचे आढळून येते. एकूणच काय तर धर्मांतरानंतर धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये केलेल्या परिवर्तनाचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येईल.

प्रकरण ५वे

दक्षिण कोकणातील धर्मांतरीत बौध्दांची शैक्षणिक प्रगती व वैचारिक परिवर्तन

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अस्पृश्यांना शिक्षण नाकारले गेल्यामुळे त्यांची प्रगती झाली नाही. मात्र धर्मांतरानंतर शिक्षणाचे महत्त्व त्यांनी ओळखले. डॉ. आंबेडकरांनी 'शिक्षण ही खऱ्या अर्थाने जीवनाच्या प्रगतीकरीता महत्त्वाची बाब आहे' हे ओळखले होते. म्हणूनच 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' याची त्यांना स्पष्ट जाणीव होती. धर्मांतरानंतर बौध्दांनी उच्च विद्याविभूषित होण्याचे स्वप्न मनात बांधले. धर्मांतराच्या पन्नास वर्षात बौध्द समाजाने शिक्षणामध्ये व एकूणच आपल्या सर्वांगिण जीवनामध्ये आमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. त्यामुळे बौध्दांची प्रगती झपाट्याने झाली. केंद्र व राज्य सरकारच्या अनेक महत्त्वाच्या जागा बौध्दांनी आपल्या परिश्रमाने प्राप्त केलेल्या आहेत. पुरूषांबरोबरच स्त्रीयांनीही शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली आहे.

बौध्द धर्माच्या स्विकारानंतर बौध्दांमध्ये वैचारिक व मानसिक परिवर्तन फार मोठ्या प्रमाणात घडून येत आहे. या सर्वांचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण ६वे

दक्षिण कोकणातील धर्मांतरीत बौध्दांचे आर्थिक परिवर्तन

पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजाला स्वत:च्या इच्छा व आवडीप्रमाणे व्यवसाय किंवा धंदा करण्याची मुभा नव्हती. अस्पृश्यांनी कोणते व्यवसाय करावे हे जाती व्यवस्थेने निश्चित केले होते. त्यामुळे अस्पृश्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट होती. मात्र बौध्द धर्माच्या स्विकारानंतर त्यांनी शिक्षणात केलेल्या अतुलनीय कामगिरीमुळे आज बौध्दांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होत असल्याचे दिसत आहे.

त्यामुळे त्यांच्या परंपरागत व्यवसायात आमुलाग्र परिवर्तन घडून आले. बौध्दांनी प्रबळ वतनदारांच्या प्रभावातून स्वत:ची मुक्तता करून घेतली आहे. त्यामुळे दक्षिण कोकणातील बौध्द आज परिवर्तनाच्या वाटेवर उभे आहेत. ज्यामध्ये अनेक लोकांनी कठोर परिश्रम करून आपला व आपल्या कुटूंबाचा तसेच समाजाचाही आर्थिक विकास घडवून आणला. ह्या सर्वांचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येईल.

प्रकरण ७वे

उपसंहार

या प्रकरणामध्ये संशोधन अभ्यासाचा सारांश व अभ्यासात आलेले निष्कर्ष मांडण्यात येतील. संशोधनाचा हा आराखडा **‘दक्षिण कोकणातील पूर्वाअस्पृश्यांचा बौध्द धम्मादिक्षेनंतरचा : ऐतिहासिक अभ्यास’ (१९५६ ते २००६)** हा विषय घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला अनुमान येण्यासाठी सादर केलेला आहे. साधनांच्या उपलब्धतेनुसार यामध्ये थोडाफार फेरफार होण्याची शक्यता असली तरी मूळ संशोधनाच्या विषयाचा गाभा मात्र हाच राहील.

परिशिष्ट क्र. १

१०) मुलाखत अनुसूची

'दक्षिण कोकणातील पूर्वाअस्पृश्यांचा बौध्द धम्मदिक्षेनंतरचा : ऐतिहासिक अभ्यास'
(१९५६ ते २००६)

वैयक्तिक माहिती : १) संपूर्ण नाव : ____ २) गाव : ______________, तालुका : ______________, जिल्हा : ______________ ३) लिंग : स्त्री / पुरूष, वय ....वर्षे, वैवाहिक स्थिती : विवाहित / अविवाहित, ४) शिक्षण : ________________, व्यवसाय : ________________ ५) वार्षिक उत्पन्न ...., जातीचा प्रवर्ग : बौध्द / नवबौध्द / बुध्दीजम ६) प्रमाणपत्र क्र. .... दिनांक ....

कौटुंबिक माहिती : ७) कुटूंबाचा प्रकार : संयुक्त / विभक्त ८) कुटूंबातील एकूण सदस्य संख्या .... अ) महिला .... ब) पुरूष ....९) अपत्यांची एकूण संख्या अ) मुलगी .... ब) मुलगा........... १०) आपल्या आजोबांच्या व वडिलांच्या शिक्षण व व्यवसायाबल माहिती द्या. अ.क्र. नाते शिक्षण व्यवसाय नोकरी ०१ आजोबा ०२ वडिल ११) आपण रहाता ते घर कुणाच्या मालकीचे आहे. स्वत:चे / वडिल / भाड्याचे आहे.

सामाजिक परिवर्तन विषयक प्रश्न :- १२) आपल्या वडिलांची जात कोणती होती?

अ) महार ब)बौध्द क)नवबौध्द ड) बुध्दिझम इ) इतर

१३) आपल्या पूर्वीच्या तुलनेत धर्मांतरीत नवबौध्द म्हणून समाजातील दर्जा कसा आहे?

अ) पूर्वीसारखाच ब) बराच उंचावलेला क) सर्वसाधारण

१४) आपण बौध्दधर्मीय आहात म्हणून इतरांकडून आपणाला वागणूक कशी मिळते?

अ) चांगली ब) वाईट क) साधारण ड) सर्वसाधारण

१५) इतर समाजाच्या तुलनेत बौध्दांची निवासस्थाने स्वच्छ असतात का? होय/नाही

१६) आपण आपल्या घरातील स्त्रीला आदराने वागविता का? होय/नाही

१७) आपण आपल्या जातीतच विवाह करता का? होय/नाही

आर्थिक विकास विषयक प्रश्न :-

१८) आपला व्यवसाय कोणता आहे? ______________________________

१९) आपण बौध्द धर्मीय झाल्यामुळे आपला विकास झाला का? होय/नाही

२०) आपण आपल्या वडिलांपेक्षा प्रगती अधिक झपाट्याने केली असे वाटते का? होय/नाही

२१) आपल्या कुटूंबातील स्त्रियांना मालमत्तेमध्ये वाटा दिला जातो का? होय/नाही

२२) आपल्या कुटूंबातील स्त्रिया नोकरी करतात का? होय/नाही

धार्मिक जीवन विषयक प्रश्न :-

२३) आपल्या घरामध्ये 'देवघर' आहे काय? होय/नाही

२४) आपण आपल्या घरातील वडिलधाऱ्या व्यक्तींच्या मृत्यूनंतर केस कापता का? होय/नाही

२५) अत्यंविधी प्रसंगी (स्मशाणात) स्त्रियांना प्रेतयात्रेबरोबर येण्याची परवानगी आहे का? होय/नाही

२६) आपण दसरा, दिवाळी, होळी, रक्षाबंधन हे हिंदू सण साजरे करता का? होय/नाही

२७) आपल्या गावात / वाडीत बौध्द विहार आहे का? होय/नाही

२८) आपण विहारामध्ये कधी जाता?

दररोज / आठवड्यातून एकदा / वर्षातून एकदा / जात नाही

२९) आपल्या घरातील धार्मिक कार्यक्रमाप्रसंगी आपण भिख्खूंना बोलविता का? होय/नाही

सांस्कृतिक जीवन विषयक प्रश्न :-

३०) बौध्द संस्कृती दर्शविणारे एखादे प्रतिक तुमच्या घरावर आहे का? होय/नाही

११)संदर्भग्रंथ(Select Bibliography)

❖ प्रकाशित मूळ साधने (मराठी)

- आंबेडकर डॉ. बाबासाहेब लिखित : हिंदू धर्माचे तत्वज्ञान भाषांतर दळवी म. य. सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे दुसरी आवृत्ती २६ जानेवारी २००६
- आंबेडकर डॉ. बाबासाहेब : क्रांती आणि प्रतिक्रांती, अनुपम पगारे, सुगत प्रकाशन, वैशाली नगर, नागपूर १२ डिसेंबर २००८
- आंबेडकर डॉ. बाबासाहेब : जातीप्रथेचे उच्खटन : भाषांतर - शिंदे गौतम, सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे दि. आवृत्ती २००५
- आंबेडकर डॉ. बाबासाहेब : शुद्र पुर्वी कोण होते? अनुवादित खैरमोडे चां. भ., सुधिर प्रकाशन बोरगाव मेघे, वर्धा, व्दितीय आवृत्ती मार्च २००३,
- आंबेडकर डॉ. भीमराव रामजी : भारतातील जाती, शरद श. हातोले, आनंद प्रकाशन जयसिंगपूरा औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २० ऑक्टो. २००७
- आंबेडकर डॉ. भीमराव रामजी : धर्मांतर का? डॉ. अशोक गायकवाड, कौशल्य प्रकाशन, एन-११, हडको औरंगाबाद, व्दितीय आवृत्ती, १४ जाने २००६
- आंबेडकर डॉ. बाबासाहेब: अस्पृश्य आणि अस्पृश्यता, रघुवंशी प्रकाशन शुक्रवार पेठ, पुणे. प्रथम आवृत्ती २००५
- मून वसंत(संपादित) : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ‘बहिष्कृत भारत आणि मुकनायक’, शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई - १९९०
- संपादक मंडळ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग १,२,३, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन -२००२
- संपादक मंडळ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १९ व २० उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन -२००५
- संपादक मंडळ : रायगड जिल्हा, कार्यकारी संपादक व सचिव दार्शनिका विभाग; महाराष्ट्र शासन, मुंबई १९९३

❖ प्रकाशित मुळ साधने (हिंदी)

- डॉ. आम्बेडकर बी.आर. : शुद्रां की खोज? प्रोग्रेसिव पब्लिशर धनवटे चेम्बर्स, सिताबर्डी नागपूर २००४

❖ प्रकाशित मुळ साधने (इंग्रजी)

- Moon Vasant (Ed.) Dr. Babsaheb Ambedkar writing and speeches, Vol 1 to 20, Publisher Deptt. Of Education Govt of Maharashtra Mumbai.

❖ प्रकाशित दुय्यम साधने (मराठी)

- अलेक्झांडर राबर्टसन : महार लोक अनुवादित भिक्षू सीवलीबोधी व दहिवले, सुगत प्रकाशन, आवळे चौक, नागपूर, व्दितीय आवृत्ती १७ ऑक्टोबर १९९१
- आवळे दिक्षित : नागवंशीय आंबेडकरी चळवळीत महारांचे योगदान, एस.के. पब्लिकेशन नागपूर -१९९८
- ऑमव्हेट गेल : वसाहतीक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९५
- आंबेडकर डॉ. भीमराव रामजी (अनु. घनश्याम तळवटकर) : भगवान बुध्द आणि त्यांचा धर्म, धर्म सासन विश्व विद्यापीठ, बल्लारपुर, विशेष आवृत्ती १९९७
- इंगळे पी. आर. : धर्माचा अविचार आणि विचारांचा धर्म, थिंकिंग बहुजन सोसायटी ऑफ इंडीया, नागपूर, २००७
- कर्वे इरावती : महार आणि महाराष्ट्र, परिपूर्ती पुणे, देशमुख आणि कंपनी पुनमुद्रण - १९९३
- कर्वे इरावती : हिंदुंची समाजरचना, रावबहुर श्रीधर गणेश परांजपे व्याख्यानमाला नागपुर विद्यापिठ नागपुर १९७५
- कोसारे एच. एल. : विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, ज्ञान - प्रदिप प्रकाशन नवी शुक्रवारी नागपूर - १९८४
- कौसल्यायन भदन्त आनंद : रामचरित मानसातील स्त्री - निंदा, भाषांतर बोरकर प्रमिला, उषा वाघ सुगावा प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती - एप्रिल २००६
- कुलकर्णी गो. म. व डॉ. विद्याधर पुंडलिक : दलित साहित्य - एक सामाजिक सांस्कृतिक अभ्यास, सुगावा प्रकाशन, पुणे १९९२
- काणे डॉ. म. म. : धर्मशास्त्राचा इतिहास, अनु. भट यशवंत, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९८०
- कांबळे उत्तम : जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, सुगावा प्रकाशन पुणे २००२
- कांबळे प्रा. अरूण : धर्मांतराची भीमगर्जना, सुगावा प्रकाशन, पुणे, व्दितीय आवृत्ती २००६
- खरात शंकरराव : अस्पृशांचा मुक्तिसंग्राम, शाम दयार्णव कोपार्डेकर, इंद्रायणी साहित्य, शनिवार पेठ द्वितीय आवृत्ती २००४
- खरात शंकरराव : महाराष्ट्रातील महारांचा इतिहास, डॉ. शकुंतला खरात, विजय हाऊसिंग सोसायटी पुणे, प्रथम आवृत्ती २००३
- खैरमोडे चांगदेव भगवान : डॉ. भिमराव रामजी आंबेडकर खंड १ ते १२, उषा वाघ, सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे प्रथम आवृत्ती २००२.
- खैरमोडे चांगदेव भगवानराव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीची पार्श्वभुमी श्रीविद्या प्रकाशन पुणे १८ एप्रिल १९८८
- गेडाम डॉ. टी.जी.: डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, प्रा.सौ.शारदा गेडाम, आवळे नगर नागपूर, प्रथम आवृत्ती २००६
- गायकवाड आर. डी. आंबेडकरी चळवळीच्या आठवणी, सुगावा प्रकाशन मुंबई १९९३.
- गायकवाड प्र.दा. : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन आणि संघर्ष, परिमल प्रकाशन औरंगाबाद १९९६

- गायकवाड नरेंद्र : मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम सुगावा प्रकाशन पुणे १९९०
- गायकवाड आर.डी.: आंबेडकरी चळवळीच्या आठवणी, उषा वाघ, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००२
- गायकवाड विजय : काश्मिरातील बुध्द इतिहास, गायकवाड प्रकाशन औरंगाबाद १९९०
- गणविर रत्नाकर : बहिष्कृत भारतातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्फुट लेख, रत्नमित्रा प्रकाशन भुसावळ १८ मे १९८१.
- गणविर रत्नाकर : आंबेडकरी चळवळ, सौ. रत्नमित्रा गणविर, रत्नमित्रा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९४
- गांजरे मा.फ. : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड १ ते ७ अशोक प्रकाशन प्रबुध्दनगर नागपूर जानेवारी १९७६
- गवळी डॉ. पी.ए. : पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता, प्रचार प्रकाशन कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १९८१
- गवळी पी. ए. व गव्हाणे सुधिर (संपा) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, मराठवाडा विद्यापीठ प्रकाशन, औरंगाबाद प्रथम आवृत्ती १९९१
- गोडबोले वामनराव : बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मदिक्षेचा अविस्मरणीय इतिहास, सुप्रिया प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती १९९८
- गजघाटे डॉ. दा. स. : बुध्दभीमाची धर्मक्रांती, ऋचा प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९२
- गारे डॉ. गोविंद : महाराष्ट्रातील दलित : शोध आणि बोध, सहाध्ययन प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती १९७३.
- चौधरी नागेश : जातिव्यवस्था आणि भारतीय क्रांती, चौधरी प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती १९९७
- जाधव वि.तु. : महाराष्ट्राचा महार, सुगत प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती १९८०
- डहाट धनराज : आंबेडकरवादी समाजक्रांती, संकेत प्रकाशन नागपूर, ऑक्टोबर २०००
- डोळस अविनाश : आंबेडकरी चळवळ, परिवर्तनाचे संदर्भ पुणे-१९९५
- तासगांवकर सतीश : बुध्द आणि त्यांच्या धर्माचे भविष्य, सुधीर प्रकाशन, वर्धा १९९३
- तेलतुंबडे डॉ. आनंद : जागतिकीकरण आणि कष्टकरी दलित बहुजन, दिग्नाग प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती २००२
- तेलतुंबडे डॉ. आनंद : आर्थिक सुधार आणि दलित शोषित, प्रबुध्द भारत प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९९६
- दळवी म. म. : नामांतर, धर्मांतर आणि राष्ट्रांतर, आनंद प्रकाशन, औरंगाबाद प्रथम आवृत्ती १९८३
- दादुमिया : दलितांचे राजकरण मेजेस्टीक बुकस्टॉल मुंबई प्रथम आवृत्ती १९७४
- दास भगवान : दलितांच्या सामाजिक आर्थिक समस्या, समता सैनिक दल स्टडी सर्कल नागपूर प्रथम आवृत्ती १९९७
- नलावडे म.दा. (संपा) : जनता प्रदित गायकवाड समता प्रकाशन लष्करीबाग नागपूर प्रथम आवृत्ती २००९.

- पानतावणे डॉ. गंगाधर : विचारयुगाचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विचार ग्रंथमाला औरंगाबाद प्रथम आवृत्ती १९७८
- पाटील डॉ. शरद : दास शुद्रांची गुलामगिरी खंड -१ प्राज्ञ प्रकाशन २७ नोव्हेंबर १९८२.
- पानतावने डॉ. गंगाधर : दलितांचे प्रबोधन, विचार ग्रंथमाला प्रकाशन औरंगाबाद - १९६८
- पानतावने डॉ.गंगाधर : विद्रोहाचे पाणी पेटले आहे, विजय प्रकाशन औरंगाबाद प्रथम आवृत्ती १९७६.
- पंडित नलिनी : स्वातंत्र्योत्तर काळातील दलितांचा प्रश्न, साधना प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती १९८७
- पवार ज. वि. : आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ, खंड १ ते ७, अस्मिता कम्युनिकेशन बोरिवली मुंबई (पूर्व), २८ नोव्हेंबर २००२
- पवार उर्मिला व मून मिनाक्षी : आम्हीही इतिहास घडविला, उषा वाघ, सुगावा प्रकाश, पुणे व्दितीय आवृत्ती- ८ मार्च २०००
- पवार दया (संपा) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई १९९९
- परेस मिलिंद : मुक्तीच्या कायनाथाकडे, सुगावा प्रकशन पुणे १९९५
- पोहरे ज. ही. : भारतीय बौध्द धर्मात जाती व अंधश्रध्दा, राहुल प्रकाशन १९८६
- पंडित नलिनी : जातीवाद आणि वर्णवाद, साधना प्रकाशन पुणे १९७८
- पवार ज. वि. (संपा) : सुर्यपूत्र भैय्यासाहेब आंबेडकर, दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, गोकुळदास पास्ता रोड, दादर मुंबई, व्दितीय आवृत्ती १७ सप्टे.२००४
- बन्सोडे पी. के. : अनुसुचित जाती व जमाती, मनोविकास प्रकाशन १९९५
- भोळे भास्कर लक्ष्मण : डॉ. आंबेडकरांचा वैयक्तिक वारसा, सुगावा प्रकाशन पुणे १९९८
- माने जी.बी. : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दलित मुक्तीसंग्राम १९४२ -४५ पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई ६ डिसेंबर १९८६
- मेश्राम डॉ.योगेंद्र : दलित साहित्य उदगम आणि विकास, मंगेश प्रकाशन नवी रामदासपेठ नागपूर प्र.आ.११ मे १९९८.
- मून वसंत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, एन ५, नवी दिल्ली, पाचवी आवृत्ती २००४
- मून वसंत : डॉ. आंबेडकर पुर्व दलित चळवळ सुगावा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती १९९३
- मेणसे कृष्णा : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी, प्रकाश विश्वासराव व लोकवाडमगृह प्रभादेवी, मुंबई - १९९८
- मून वसंत : मध्यप्रांत व वऱ्हाडातील डॉ. आंबेडकर पूर्व दलित चळवळ, उषा वाद्य सुगावा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती १९८७.
- मुणगेकर डॉ. भालचंद्र : भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित, सुगावा प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती २००५
- महास्थविर पू. भदन्त सदानंद : भारतीय बौध्दांची वाटचाल आणि दिशा, सध्दमादित्य प्रकाशन, केळझर वर्धा २००३
- मनोहर डॉ. यशवंत : डॉ. आंबेडकरांचा बुध्दधर्म, रमेश जीवने यवतमाळ १९८८

- मुरूगकर डॉ. लता : दलित पँथर चळवळ, सुगावा प्रकाशन पुणे १९९५
- मेश्राम प्रा. केशव : धर्मांतराचे अर्धशतक, लोकवाङमय गृह मुंबई, व्दितीय आवृत्ती २००६
- मेश्राम उध्वराज : बौध्द स्थळांचा इतिहास, सुधीर प्रकाशन वर्धा
- मोरे मा. शं. : महाराष्ट्रातील बुध्द धर्माचा इतिहास, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद २०००
- मुन वसंत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडीया, नवी दिल्ली २००३
- मोरे चिंतामण : बुध्दाची शिकवण, सुगावा प्रकाशन पुणे १९९५
- मुगले चंद्रकांत : डॉ. आंबेडकरांची राजकीय संघटनेची वाटचाल, सिध्दार्थ हसन प्रकाशन १९९५
- लभाणे म. वि. : बौध्द धर्म जगाच्या सुर्य, त्रिरत्न प्रकाशन १९८४
- लभाणे म. वि. : हिंदु धर्म आणि अस्पृश्यांचा अभुदय, त्रिरत्न प्रकाशन १९८१
- लोखंडे डॉ. भाऊ : डॉ. आंबेडकर सैनिकांची गौरवगाथा, सुधीर प्रकाशन, वर्धा १९९७
- लिंबाळे शरदकुमार : दलित चळवळ प्रचार प्रकाशन कोल्हापूर - १९९१
- वसंत वाघमारे : जातीव्यवस्था निर्मिती आणि स्वरूप, उषा वाघ, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, प्रथम आवृत्ती, जानेवारी २००६
- वानखेडे चंद्रकांत : मातंग समाज आणि आंबेडकरवाद, सुधीर प्रकाशन, वर्धा १९९८
- वाळिंजकर आत्माराम : दलित मुक्ती चळवळ परिवर्तनाचे संदर्भ, डिंम्पल पब्लिकेशन आनंदनगर नवघर, ठाणे, २४ मार्च २००७
- वराळे बळवंत हणमंतराव : डॉ. आंबेडकरांच्या सांगाती, श्रीविद्या प्रकाशन पुणे १९९८.
- शिंदे वि. रा. : भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, कौशल्य प्रकाशन हडको, औरंगाबाद २३ एप्रिल २००३.
- सरवदे प्र. रा. : धर्मांतराची पन्नास वर्षे, सिध्दार्थ बुक सेंटर कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १ जाने. २००७
- सुरवाडे विजय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर-जीवनपट आणि चळवळ खंड १ व २, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती २००७
- सोमवंशी बी.सी. : बौध्दधर्मिय मातंग, आनंद प्रकाशन, औरंगाबाद १९९८
- साळवे दिनकर : १९५६ नंतरची दलित चळवळ, दिग्नाग प्रकाशन पुणे २००१
- सांळुखे डॉ. आ. ह. : गुलामांचा आणि गुलाम करणाऱ्यांचा धर्म एक नसतो, लोकायत प्रकाशन सातारा.
- होवाळ रविनंद नामदेव : धर्मांतराची पन्नास वर्षे काय कमावले, काय गमावले? नमोत्क्रांती प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २००७

❖ प्रकाशित दुय्यम साधने (हिंदी)

- उमराव सिंह (संपादित) डॉ.बाबासाहेब आम्बेडकर संपुणे वाड:मय खंड १ ते १७ डॉ. अम्बेडकर प्रतिष्ठान, कल्याण मंत्रालय भारत सरकार नई दिल्ली - १९९८.
- कोसंबी दामोदर धर्मानंद : प्राचीन भारत की संस्कृती और सभ्यता, राजकमल प्रकाशन नई दिल्ली - १९९८

- कौसल्यानंद आनंद : धर्मांतर का संकल्प, पब्लीश प्रकाशन - १९९३
- नैमिशराय मोहनदास : भारतीय दलीत आंदोलन, बुक्स फॉर चेंज नई दिल्ली - २००४
- बापट पी.वी. : बौध्द धर्म के २५०० वर्षे, प्रकाशन विभाग, भारत सरकार दिल्ली - १९९८.
- बाली एल. आर : डॉ. आंबेडकर की दृष्टी में धर्म, भिम पत्रिका प्रकाशन जालंधर.
- भटनागर राजेंद्र मोहन : डॉ. आंबेडकर चिंतन और विचार, जगतराम अँड सन्स दिल्ली - १९९२.
- भारती कवल : डॉ. आंबेडकर बौध्द क्यो बने, आदिल प्रकाशन - १९९६
- माता डॉ.कौशिक : सामजिक बुटाईयों के उन्मूलन मे कबीर का योगदान, नमन प्रकाशन अंसारी रोड, दरियागंज नई दिल्ली - २००५
- शर्मा के. एल. : भारतीय सामाजिक संरचना एवं परिवर्तन प्रेम रावत, रावत पब्लिकेशन जवाहरनगर जयपूर - २००६.
- जाटव डॉ. डी.आर. : राष्ट्रीय आंदोलन मे डॉ. अम्बेडकर की भूमिका, समता साहित्य सदन, जयपूर १९९६
- शर्मा रामशरण : शुद्रो का प्राचीन इतिहास, राजकमल प्रकाशन नई दिल्ली, पाचवी आवृत्ती, पुर्नमुद्रित, २००५
- श्रीमाली कृष्ण मोहन : धर्म, समाज और संस्कृती, श्यामबिहार राय, ग्रंथ शिल्पी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, लक्ष्मीनगर दिल्ली - २००५
- जाटव डी. आर. आंबेडकर का धर्म दर्शन, समता साहित्य प्रकाशन - १९९३

❖ प्रकाशित दुय्यम साधने (इंग्रजी)

- Zelliot Eleanor : From untochable to dalit : Essay on the Ambedkar Movement, Manohar Publishers Daryargang New Delhi - Third. Edition 2001
- Kshirsagar R. K. : Untochability in India, Deep & Deep Publication Pvt. Ltd. New Delhi - 2001
- Ghuraye G. S. : Caste, Class and Occupation, Popular Publication, Bombay 1994.

नियतकालिके व वृत्तपत्रे

- जनता
- समता
- दैनिक केसरी
- दैनिक नवयुग
- ब्राम्हण - ब्राम्हणेत्तर (पाक्षिक) दादर
- ज्ञानोदय
- ज्ञानप्रकाश
- नवभारत
- नवशक्ती
- बहिष्कृत भारत
- मूकनायक
- प्रबुध्द भारत

संशोधक
प्रमोद एस. मेश्राम
(एम. ए. नेट.)

मार्गदर्शक
डॉ. राठोड यु. सी.
विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
नूतन महाविद्यालय, सेलू, ता. सेलू,
जि. परभणी, ४३१५०३